# प्रेस नोट

दि. २३/०५/२०१४

➢ मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१/११/२०१३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी कार्यक्रम घोषित केला होता. त्यास अनुसरुन दि. ०१/०२/२०१४ रोजी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादयांची अंतीम प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.

**पदवीधर मतदारासाठी आवाहन**

➢ सोलापूर जिल्हयातील सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय तसेच तहसिलदार कार्यालय येथे जे मतदार त्या मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी आहेत आणि ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी किमान ३ वर्ष पदवीधर असेल (दि. ०१/११/२०१० या अर्हता दिनांक) अशी प्रत्येक व्यक्ती पदवीधर मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यास पात्र आहे.

➢ ज्या मतदारांनी अद्यापी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ केले नाही अशा मतदारांनी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणेकामी दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत फॉर्म क्र १८ सादर करावा. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रावर संबंधीत BLO, पोस्ट मास्तर, पदनिर्देशीत अधिकारी, नायब तहसिलदार, ITI प्राचार्य, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपालिका, यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यांनी सांक्षकिंत केलेले व अर्ज ग्राहय धरणेत येईल.

➢ सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in. यावर सर्व संबंधीत केद्रीय स्तरीय अधिकारी (BLO) व मतदार सहाय्यता केंद्रप्रमुख, निवडणुक नायब तहसिलदार यांचे मोबाईल क्रमांक व दुरध्वनी क्रमांक उपलब्ध आहेत.

**शिक्षक मतदारासाठी आवाहन**

➢ शिक्षक मतदार संघाकरिता ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी सलग ६ वर्षापैकी किमान ३ वर्ष शिक्षकाचे पुर्णवेळ काम करणारी व्यक्ती हे शिक्षक मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहेत.

➢ ज्या मतदारांनी अद्यापी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ केले नाही अशा मतदारांनी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणेकामी दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत फॉर्म क्र १९ सादर करावा. त्या सोबत (Annexure - II) मध्ये सेवेचा तपशील मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने सादर करावा.

➢ शिक्षक मतदार यादीतील सेवेचा तपशील दिलेला नसलेने वगळणी केलेल्या मतदारांची यादी सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in. यावर उपलब्ध आहे. अशा मतदारांना आपल्या सेवेचा तपशील दिनांक ०३/०६/२०१४ पर्यंत संबंधीत तहसील कार्यालयात Annexure - II मध्ये फॉर्म नंबर १९ सह सादर करावा.

असे जिल्हाधिकारी सोलापूर यांनी कळविले आहे.